कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विदयामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- http://kbmc.gov.in

जावक क्रमांक/कु-ब.न.प./नरवि/ ०४८८ /२०१९-२०२० दिनांक: २०/०९/२०१९

अपेंडीक्स - I

बांधकाम पूर्णतेचा दाखला / भोगवटा प्रमाणपत्र

प्रति,
श्री.राजेंद्र दशरथ चव्हाण व इतर एक
द्वारा श्रीमती आरती व्हि.जामगांवकर (इंजिनिअर), कुळगांव-बदलापूर

श्रीमती आरती व्हि.जामगांवकर, (अभियंता), कुळगांव-बदलापूर बांधकाम परवाना क्र. कुबनप/५४ यांचे दिनांक २५/०२/२०१९ रोजीचे अर्जावरुन दाखला देण्यात येतो की, त्यांनी कुळगांव-बदलापूर नगरपरिषद हद्दीत स.नं.२८अ, हि.नं.२/१ पैकी, मौजे बेलवली, ता.अंबरनाथ कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांचे कडील बांधकाम परवानगी जा.क्र. कुबनप/नरवि/बांप/५२७२-९१, दिनांक २८/०८/२०१५ अन्वये मंजूर केलेल्या नकाशे प्रमाणे रहिवास वापरासाठी बांधकाम पूर्ण केले आहे. (बांधकाम पूर्ण झाल्याची तारीख २०/०२/२०१९) मंजूर नकाशानुसार केलेल्या बांधकामामध्ये खालील तक्त्यात समाविष्ट सदनिकांचा समावेश आहे.

मजले	इमारत				वापर
१) तळमजला	४	सदनिका	१२	खोल्या	रहिवास
२) पहिला मजला	४	सदनिका	१२	खोल्या	
३) दुसरा मजला	४	सदनिका	१२	खोल्या	
४) तिसरा मजला	४	सदनिका	१२	खोल्या	
५) चौथा मजला	४	सदनिका	१२	खोल्या	
एकूण-	२०	सदनिका	६०	खोल्या	

सबब, वरील जागेतील इमारतीसाठी जी श्रीमती.आरती व्ही.जामगांवकर, परवानाधारक अभियंता यांच्या देखरेखीखाली पूर्ण झालेली आहे, खालील अटींचे अधीन राहून भाग भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१ जेव्हा सज्जा (बाल्कनी) बंदिस्त करण्यात आला/आली असेल तर त्याचे समोरील व वरील १/३ क्षेत्रासाठी, लुवर्स ग्लास, शटर्स अथवा ग्रील्स लावणे, अनिवार्य राहील व पॅरापेट सोडून उर्वरित समोरील क्षेत्रासाठी ग्लेजड शेटर्स बंदिस्त करणे आवश्यक राहिल.

२ तसेच तळमजल्यास व टेरेस फ्लोअरला बाल्कनी बंदिस्त करणे अनुज्ञेय असणार नाही. तसेच आजूबाजूच्या सामासिक अंतरात कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

३ भोगवटा प्रमाणपत्र सोबत दर्शविलेले नकाशातील बांधकामा व्यतिरिक्त इतर बांधकाम हे अनधिकृत समजण्यात येवून त्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४ भविष्यात सामासिक अंतरातील जागा नगरपरिषदेस रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक भासल्यास हस्तांतरीत करावी लागेल. टेरेस व पॉकेट टेरस बंदिस्त करु नये.

५ पावसाळी पाणी वाया जावू नये यासाठी रुफ टॉप हार्वेस्टिंग करणेत यावे व पाणी जमीनीमध्ये मुरवावे.

६ सुका व ओला कचरा अलगीकरणासाठी व साठा करण्यासाठी स्वतंत्रपणे जागा निर्धारित करुन कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी संयंत्र उभारण्याची जबाबदारी विकासकाची आहे.

सहाय्यक नगर रचनाकार
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

मुख्याधिकारी तथा नियोजन प्राधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

प्रत, कर विभाग, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद

Scanned with CamScanner

महाराष्ट्र सत्यमेव जयते शासन

नोंदणी प्रमाणपत्र

नोंदणी क्रमांक :- टीएनए/एएमबी/एचएसजी/(टिसी)/३५१६०/२०२२-२३/सन २०२२

या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करण्यांत येते की,

" **अवंतिका रेसिडेन्सी** ". को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., जुना सर्व्हे नं. २८ अ, हिस्सा नं. २/१ (पैकी), नवीन सर्व्हे नं. २८ अ/२/१/घ, जुना सर्व्हे नं. २८ अ, हिस्सा नं. २/१ (पैकी), नवीन सर्व्हे नं. २८अ/२/१/ख, मौजे-बेलवली, बदलापूर (पश्चिम), ता. अंबरनाथ, जि. ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील (सन १९६१ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यांत आलेली आहे.

उपरोक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण **"गृहनिर्माण संस्था"** असे असुन उपवर्गीकरण **"भाडेकरु सहभागीदारी गृहनिर्माण संस्था"** असा आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अंबरनाथ तालुका
Assistant Registrar, C.S. Ambernath
Dist. Thane
जि. ठाणे

(रामचंद्र लोखंडे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका.

दिनांक :- १०/१०/२०२२
ठिकाण :- अंबरनाथ.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका

यांचे कार्यालय
ऑफीस क्र. १०३ व १०४, श्री साई पनाचे को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., एम्पायर कॉम्प्लेक्सच्या समोर, सी-मार्टच्या वर, कल्याण-बदलापूर रोड, चिखलोली, अंबरनाथ (पश्चिम), ता. अंबरनाथ, जि. ठाणे.
सत्यमेव जयते
दुरध्वनी क्र.- ८०८०११२७४५ Email ID - arcs.tna.ambernath@gmail.com

जा.क्र. सनि/अंबरनाथ/बी-४/सगृहनिसं/नोंदणी/2289 /सन २०२२
दिनांक :- १०/१०/२०२२

ज्ञा प न :-

" **अवंतिका रेसिडेन्सी** " को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., जुना सर्व्हे नं. २८ अ, हिस्सा नं. २/१ (पैकी), नवीन सर्व्हे नं. २८ अ/२/१/घ, जुना सर्व्हे नं. २८ अ, हिस्सा नं. २/१ (पैकी), नवीन सर्व्हे नं. २८अ/२/१/ख, मौजे-बेलवली, बदलापूर (पश्चिम), ता. अंबरनाथ, जि. ठाणे या संस्थेच्या वतीने मुख्यप्रवर्तक श्री. अभिजीत चंद्रकांत साळवी (मुख्यप्रवर्तक) यांचेकडे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका, यांनी रितसर मंजूर केलेल्या पोटनियमांची एक प्रत आणि नोंदणी प्रमाणपत्र क्र. टीएनए/एएमबी/एचएसजी/(टिसी)/ ३५१६०/२०२२-२३/सन २०२२, दि. १०/१०/२०२२ सोबत पाठविण्यांत येत आहे.

२. श्री. विजयसिंग अ. पाटील, सहाय्यक सहकारी अधिकारी (प्रभारी), संलग्न सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका, अंबरनाथ यांना सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका यांचे वतीने पहिल्या साधारण सभेत उपस्थित राहण्याचे आणि त्या सभेच्या प्रतिवृत्तांच्या प्रतीसह पोटनियमांच्या प्रतीसह पोटनियमांच्या औपचारीक स्विकृतीचे निवेदन सादर करण्याबाब्रत कळविले आहे.

३. पहिल्या साधारण सभेच्या वेळी मंजूर केलेल्या पोटनियमांची औपचारीक स्विकृती केली पाहिजे व अशी सभा महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ५९ अन्वये नोंदणीचे दिनांकापासून तीन महिन्यांचे आंत बोलविले पाहिजे.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अंबरनाथ तालुका, Assistant Registrar, C.S. Ambernath, Dist. Thane, जि. ठाणे

(रामचंद्र लोखंडे)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका.

प्रति :-

१) श्री. अभिजीत चंद्रकांत साळवी, मुख्यप्रवर्तक " **अवंतिका रेसिडेन्सी** " को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., जुना सर्व्हे नं. २८ अ, हिस्सा नं. २/१ (पैकी), नवीन सर्व्हे नं. २८ अ/२/१/घ, जुना सर्व्हे नं. २८ अ, हिस्सा नं. २/१ (पैकी), नवीन सर्व्हे नं. २८अ/२/१/ख, मौजे-बेलवली, बदलापूर (पश्चिम), ता. अंबरनाथ, जि. ठाणे

२/- त्यांना प्रत देऊन कळविण्यांत येते की, तीन महिन्याच्या आत पहिल्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करुन सदर सभेत संस्थेच्या हंगामी व्यवस्थापन समितीची निवड करावी व सभेचे इतिवृत्त या कार्यालयास सादर करावे.

२) श्री. विजयसिंग अ. पाटील, सहाय्यक सहकारी अधिकारी (प्रभारी), संलग्न सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका, जि. ठाणे

२/- त्यांना प्रत देऊन कळविण्यांत येते की, संस्थेच्या मुख्य प्रवर्तक यांनी आयोजित केलेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेस उपस्थित रहावे.

३) अध्यक्ष, ठाणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थाचा संघ मर्यादित, ठाणे.
४) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे.
५) मा. जिल्हा विशेष लेखा परिक्षक, सहकारी संस्था, ठाणे.

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका

Scanned with CamScanner